# **पुष्प वृष्टी**

पाझरते नभी राती मंद शांत चांदणे
करुणा रामा सतत तुझी तशी झिरपू दे ||१||

दिनमणी दिनभरी उधळी उजेड आकाशी
पाखरण कर आयुभर कृपेची तूही तशी ||२||

सागरतटी वाळवंटी वाहे वायू वेगवान
तसाच माझा भक्ती घडा दे वाहू ओसंडून ||३||

हिमालयी हिम कण भुरभुरती सर्वदूर
दे शक्ती पुष्प वृष्टी करण्या तशी मंदिरावर ||४||

– नारायण
०७/११/२३